दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक २०० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१५ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

शिवसेनेच्या दसरा मेळाव्यामध्ये उद्धव ठाकरेंची तोफ धडाधडणार

दै.रायगड नगरी । मुंबई

दरवर्षी शिवतीर्थावर होणारा दसरा मेळावा कोरोना काळात बंद हॉलमध्ये कमी लोकाच्या उपस्थित होऊ लागला आहे. पण तरीही उद्धव ठाकरेंच्या भाषणानं सैनिकांमध्ये तोच जोश पाहायला मिळतोय यंदाच्या मेळाव्यात ठाकरेंची तोफ कुणाकुणावर डागणार? ठाकरेंच्या तावडीत कोण सापडणार? सैनिकांना मेळाव्यात नवीन उर्जा मिळाणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दसरा मेळावा शिवसैनिकांसांठी एक उर्जेचा स्त्रोतच जणू. बाळासाहेब ठाकरेंपासून ते उद्धव ठाकरेंपर्यंत दसरा मेळाव्याल्या शिवसैनिक हजारोंच्या संख्येनं गर्दी करतात आणि एक नविन उर्जा घेऊन पक्षाच्या कामाला सुरुवात करतात. शिवसेनेच्या दसऱ्या मेळाव्याला एक वेगळीच परंपरा आहे. गेली अनेक वर्ष शिवाजी पार्कच्या मैदानात ठाकरेंची तोफ धडधडायची. पण यंदा हा सोहळा षण्मुखानंद सभागृहात होणार आहे. त्यामुळे हजारोंच्या संख्येने भाषण देणाऱ्या ठाकरेंना यंदा मोजक्याच लोकांसमोर भाषण करावं लागणार आहे. पण महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात पोहचण्यासाठी ऑनलाईनची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. या मेळाव्याला शिवसेनेचे नेते, मंत्री, आमदार विभागप्रमुख, महापौर आणि महापालिकेतले महत्वाचे नेते उपस्थित राहणार आहेत.

आगामी महानगरपालिका निवडणुका डोळ्यांसमोर ठेवत सैनिकांसाठी हा मेळावा अत्यंत महत्वाचा आहे. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असल्यानं उद्धव ठाकरेंच्या निशाण्यावर राज्यातले आणि केंद्रातले भाजपचे नेते असतील असं म्हटलं जातंय. तसेच यातील सर्वात महत्वाचा मुद्दा असणार आहे, तो म्हणजे केंद्रीय यंत्रणा. गेल्या अनेक दिवसांपासून केंद्रीय यंत्रणा राज्यातल्या विविध नेत्यावर कारवाई सुरु आहे. ईडी, सीबीआय आणि आता एनसीबीच्या कारवाईवरही प्रश्नचिन्ह निर्माण केलं गेलं आहे. अशातच शिवसेना महाविकास आघाडीसोबत जरी असली तरी सावरकरांना भारतरत्न देण्याची त्यांची आजही आग्रही मागणी राहिली आहे. त्यामुळे शिवसेनेचं सावरकर प्रेम अजुनही कमी झालेलं नाही. त्यामुळं नव्यानं सावरकरामुळे सुरु झालेल्या वादावर उद्धव ठाकरे खरपूस समाचार घेतील.

लखीमपूर प्रकरणात केंद्र सरकारचा चिडीचूपपणा, महाराष्ट्र बंद शेतकरीविरोधी धोरणं यावर उद्धव ठाकरे आवर्जुन बोलणार राज्यातल्या शेतकरी धोरणं जाहीर करतील. कोरोना काळात मुंबई महाराष्ट्र वगळता ाक्सिजन आणि लसीवरून जे राजकारण रंगलं त्यावरून उद्धव ठाकरे जाहिरपणे बऱ्याचवेळा बोलले, पण आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर राज्यात काय काय केलं? हे सांगायला ठाकरे विसरणार नाहीत. तसेच गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यपाल नियुक्त सदस्यांची नावं भगतसिंग कोश्यारी मंजूर करत नाहीत. तसेच विविध धोरणात राज्यपाल आणि सरकारमध्ये एकमत नसतानाचे बरेच किस्से आहेत. त्यामुळे ठाकरे राज्यपालांचाही समाचार घ्यायला विसरणार नाहीत. शिवसेना धर्मनिरपेक्ष विचारवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत हातात हात घालून आहेत. पण राम मंदिर, हिंदुत्व, भगवा यावर शिवसेना अजुनही ठाम आहे. त्यामुळे आपली विचारधार बदलेली नाही आणि बदलणार नाही हे दाखवून देणार आहेत. राज्यात आगामी महाविकास विरुद्ध भाजप असा संघर्ष सुरु आहे. त्यात रोज नवनवीन टीका टिपण्णी ऐकायला मिळते. पण त्यावर ठाकरे सहजासहजी बोलत नाहीत. या मेळाव्यात भाजपच्या महत्त्वाच्या नेत्यांचा समाचार घेणार एवढं नक्की. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यापासून शिवसैनिकांची छाती अभिमानानं आधीच फुलली आहे. त्यात मेळाव्यात भाजप आणि टीमवर शब्दांचे बाण फेकत शिवसैनिकांमध्ये उर्जा भरण्याचं काम उद्धव ठाकरे करतील. त्यामुळे आगामी निवडणुका आणि सध्याची परिस्थिती लक्षात घेता शिवसेनेसाठी हा मेळावा उर्जादायी ठरतोय का? हे निवडणुकांचा काळच ठरवेल.

संक्षिप्त...

आर्यन खानच्या जामिनावर २० ऑक्टोबरला फैसला

दै.रायगड नगरी । मुंबई

क्रूझ ड्रग्ज प्रकरणात अभिनेता शाहरुख खान याचा मुलगा आर्यन खानला २० ऑक्टोबरपर्यंत तुरुंगातच राहावे लागणार आहे. आर्यन खान, अरबाझ मर्चंट, मुनमून धमेचा यांच्या जामीन अर्जांवर २० ऑक्टोबरला निर्णय होणार आहे. सुनावणी पूर्ण केल्यानंतर कोर्टाने निर्णय ठेवला राखून आहे.

आर्यन शाहरुख खानच्या जामीन अर्जावर आजही निर्णय झाला नाही. दोन्ही बाजूच्या युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने २० ऑक्टोबरला निर्णय जाहीर केला जाणार असल्याचे कोर्टाने स्पष्ट केले.

एनसीबीने आज मोठमोठे खुलासे केले आहेत. सरकारी वकिलांनी आर्यनच्या जामिनाला विरोध करत आर्यन खान गेल्या अनेक वर्षांपासून ड्रग्ज घेत असल्याचा आरोप केला आहे.

जरी त्याच्याकडे ड्रग्ज सापडले नसले तरी तो अनेक वर्षांपासून ड्रग्ज घेतो आणि ड्रग पेडलरांच्या संपर्कात असतो.

समीर वानखेडे यांना मुंबई पोलीस पाठवणार समन्स

दै.रायगड नगरी । मुंबई

एनसीबीचे झोनल डायरेक्टर समीर वानखेडे यांना मुंबई पोलीस चौकशीसाठी समन्स पाठवणार आहे. मुंबईपोलिसांचा साधा वेशातील पोलीस पाळत ठेवत असल्याचा समीर वानखेडेंनी आरोप केला होता, त्यानंतर चौकशीसाठी मुंबई पोलीस आयुक्त यांनी आदेश दिले आहे.

एनसीबीचे झोनल डायरेक्टर समीर वानखेडेंनी त्यांच्यावर पाळत ठेवली जात असल्याचा दावा करत मुंबई पोलिसांत तक्रार केली होती. त्या प्रकरणी मुंबई पोलिसांनी चौकशी सुरु केल्याची माहिती मिळत आहे. अतिरिक्त आयुक्त दर्जाचा अधिकारी या प्रकरणाची चौकशी करत आहे. वानखेडेंनी सादर केलेल्या पुराव्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चौकशी करत काही प्रश्न विचारल्याचं कळत आहे.

सीसीटीव्हीमध्ये दिसणारे दोन्ही कॉन्स्टेबल ओशिवाराच्या डिटेक्शन विभागाचे आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या दोन कर्मचाऱ्यांनाचे फोटो समोर आले आहे. त्यानंतर त्या पोलीस कर्मचाऱ्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी केली. चौकशीमध्ये दोन कर्मचाऱ्यांनी सांगितले की, हे फोटो कुठले आहे हे त्यांच्या लक्षात नाही.

शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानला गेल्या आठवड्यात मुंबईच्या खोल समुद्रात क्रूझवर रेव्ह पार्टी करताना पकडण्यात आले होते. यावरून राज्य सरकार आणि एनसीबीमध्ये आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. आर्यन खानकडे ड्रग सापडलेले नसताना त्याला अटक करण्यात आली आणि त्यांचे लक्ष्य शाहरुख असल्याचा आरोप राज्याचे मंत्री नवाब मलिक यांनी केला होता. यावर आता या प्रकरणाने वेगळेच वळण घेतले आहे. एनसीबीचे मुंबईतील झोनल डायरेक्टर समीर वानखेडेंनी आपल्यावर दोन साध्या वेशातील मुंबई पोलिसांकडून गेल्या काही दिवसांपासून पाळत ठेवली जात असल्याची तक्रार केली. महाराष्ट्राचे डीजीपी संजय पांडे यांच्याकडे ही तोंडी तक्रार केल्याने खळबळ उडाली. ओशिवारा पोलिसांनी स्मशानात जात असताना समीर वानखेडे यांचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. वानखेडे यांच्या आईचे २०१५ मध्ये निधन झाले आहे. तेव्हा पासून ते या ठिकाणी जातात, असे सांगितले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई पोलिसांचे पोलीस पाळत ठेवत असल्याची तक्रार मुंबई पोलिसांच्या अधिकाऱ्यांना एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी केली.

श्रीवर्धनमध्ये विषारी सर्प दंशाने तरूणाचा मृत्यू

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

बारावीत शिकत असलेल्या एका तरूणाचा सर्प दंशाने मृत्यू झाल्याची श्रीवर्धन शहरात दुर्दवी घटना घडली आहे या बाबत सविस्त असे

श्रीवर्धन शहरातील गणेश आळी येथिल कु. रोशन सुरेंद्र चोगले वय १८ वर्षे हा दिं १३ आँक्टों २०२१ रोजी रात्री जेवण करून १०:३० वाजताच्या सुमारास रस्त्यावर फेरफटका मारण्या करीता गेला असता घरा पासून काही अंतरावर मुख्य रस्त्यावरुन जात होता यावेळी संपुर्ण तालुक्यात काहीकाळ विद्युत पुरवठा तांत्रिक अडचणीमुळे खंडीत झाला होता त्यामुळे रस्त्यावर अंधार होता

यावेळी रोशन रस्त्यावरून चालला असताना त्याच्या पायाला विषारी सर्पाने दंश केला रोशनने वडीलांना हाक मारीत आरओरड करीत पळत आपल्या घराकडे परतला व साप चावल्याचे सांगितले वडीलांनी ताबडतोब जवळ असलेल्या उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथे घेऊन गेले व दाखल केले डॉ मधुकर ढवळे यांनी त्वरीत उपचार सुरु केले मात्र उपचार सुरु असताना काही वेळातच रात्री ११ : ३० वाजताच्या सुमारास रोशन याचा मृत्यू झाला रोशन र. ना. राऊत विद्यालयात बारावी इअत्तेत शिकत होता. त्याच्या आकस्मिक निधनाने संपुर्ण तालुक्यांत हळहळ व्यक्त होत आहे तो आईवडीलांचा एकुलता एक होता त्याचे वडील सुरेंद्र चोगले हे श्रीवर्धनमध्ये आरटी ओ विमा प्रतिनिधी म्हणून काम करतात.

|| श्री गणेशाय नमः ||
उद्घाटन सोहळा
शुक्रवार दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ११.००वा.
विशाल डायग्नॉस्टिक्स् ॲण्ड इमेजींग
Facilities
• CT Scan(50 Slice)
• Ultrasonography
• Pathology
• 2D Echo
• MRI Scan(1.5 T, 16 Channel)
• Digital X Ray
• Physiotherapy
• ECG
उदघाटक : मा.आमदार प्रशांतदादा ठाकूर
* प्रमुख पाहुणे *
मा.डॉ.सौ.कविता चौतमल
मा. महापौर पनवेल महानगरपालिका
मा.श्री.विक्रांत बाळासाहेब पाटील
मा.उपमहापौर पनवेल महानगरपालिका
प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र भाजपा युवा मोर्चा
मा.श्री.ॲड.मनोज भुजबळ
नगरसेवक, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष,भाजपा ओबीसी मोर्चा
अध्यक्ष, पनवेल वकील संघटना
* आदरणीय डॉक्टर्स *
डॉ.गिरीष गुणे
डॉ.सुरेश मोरे
डॉ.समीर सहस्त्रबुध्दे
डॉ.शैलेश पालेकर
डॉ.ययाती गांधी
डॉ.दिपक पुरोहित
डॉ.दिपक कुलकर्णी
डॉ.नितीन म्हात्रे
डॉ.रविंद्र ईनामदार
डॉ. सी.भिडे
डॉ.प्रमोद गांधी
डॉ.अनिल परमार
डॉ.डी.बी.पाटील
निमंत्रक
डॉ.विशाल दळवी
डॉ.तृप्ती दळवी
* ठिकाण *
शॉप नं.३ व ४, श्री सहाय्य ओझोन,प्लॉट नं.१६३,एम.सी.सी.एच.सोसायटी,
सुरुची हॉटेल जवळ, पनवेल.

श्री धावीर महाराज देवस्थानाच्या जागेवरील सीमाशुल्क विभागाचे आरक्षण हटणार

खासदार सुनील तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित

दै.रायगड नगरी । अलिबाग

श्री धावीर महाराज मंदिर हे जिल्ह्यातील रोहा शहरातील काही महत्वपूर्ण देवस्थानांपैकी एक असून त्यास सुमारे १७५ वर्षांहून अधिक प्राचीन परंपरा तसेच गौरवशाली इतिहास लाभला आहे. येथे येणारे सर्व लोक धर्म, जात, लिंग आणि पंथ यांचा विचार न करता या मंदिराला आपले श्रद्धास्थान मानतात. संपूर्ण भारतात, केवळ दोनच मंदिरे अशी आहेत, जिथे देवतांना राज्यातील पोलिस दलाकडून सशस्त्र गार्ड ऑफ ऑनर दिले जाते आणि श्री धावीर महाराज मंदिर देवस्थान हे त्यापैकी एक आहे, ही रायगडवासियांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

मात्र श्री धावीर महाराज देवस्थानाच्या जागेवर सीमाशुल्क विभागाचे आरक्षण लागू झाले होते. या आरक्षणानंतर, आज ४० वर्षांहून अधिकचा काळ ओलांडला आहे, परंतु या जागेचा सीमाशुल्क विभागाद्वारे कोणत्याही प्रकारचा वापर केला गेला नाही. त्यामुळे ही जागा पुन्हा श्री धावीर महाराज देवस्थानास मिळावी, याकरिता खासदार

…/२

अश्लिल व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकण्याची धमकी देवून १० लाखाची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

अश्लिल फोटो व व्हिडीओ क्लिप सोशल मिडीयावर तसेच नातेवाईकांकडे पाठवून बदनामी करीन त्याबदल्यात मला १० लाख रुपये दे अशी धमकी देणाऱ्या एका इसमाविरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील कोप्रोली गावात राहणाऱ्या एका ३० वर्षीय महिलेला एका ओळखीच्या इसमाने सदर महिलेचा विश्वास संपादन करून तिच्या राहत्या घरी तिच्या नकळत तिचे अश्लिल फोटो व व्हिडीओ तयार करून सदर व्हिडीओ हे तुझे नातेवाईक, समाजात तसेच सोशल मिडीयावर टाकण्याची बदनामी करून १० लाख रुपयाची मागणी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

स्वातंत्र्याच्या लढ्यात : कोकणाचे योगदान : डॉ.गणेश मुळे

देशात आणि राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्ष सुरु आहे. कोकणापुरता विचार केला तर, गेल्या ७५ वर्षात कोकण विभागात स्वातंत्र्यानंतर अनेक बदल घडले. विकासाचे नवे पर्व सुरु झालेअसले तरी, या स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रक्रियेत अनेक स्वातंत्र्य सेनानी यांचे योगदान मोठे होते. म्हणूनच हा लढा यशस्वी झाला हे मान्य केले पाहिजे. कृषि, उद्योग, तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, सिंचन, दळणवळण सारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात कोकण विभागात मोठया प्रमाणावर काम उभे राहिल्याचे चित्र दिसते आहे.

परवाच सिंधुदूर्ग जिल्हयातील पहिले ग्रीनफिल्ड विमानतळ चिपीचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या भाषणाचे सूत्रच मुळात कोकणाचा सर्वांगिण विकास कसा होतो आहे आणि भविष्यात अजून कसा करता येईल हाच धागा होता. कोकणातील पायाभूत सुविधा वाढत आहेत. त्यादृष्टीने अनेक प्रकल्प गेल्या काही वर्षात उभे राहिले हे दृश्य स्वरुपात दिसते आहे.

समृध्द समुद्र किनारा, हिरवेगार डोंगर, सागरी किल्ले या सोबतच देशातील उत्तम हवामान कोकणात आहे. अशा परिस्थितीत पर्यटनाच्या सोयी सुविधा मोठया प्रमाणावर उभारून देशी आणि विदेशी पर्यटकांसाठी नवी संधी उपलब्ध करून दिली जात आहे. पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदूर्ग देशात ओळखला जातो. रत्नागिरी जिल्हयात असणारे अनेक पर्यटन ठिकाणे पर्यटकांना आकर्षित करतात. रायगड किल्ला हा महाराष्ट्राचे वैभव म्हणून ओळखले जाते. इंग्रजांविरुध्द कोकणाने दिलेल्या लढ्याच्या या समृध्द खूणा आहेत.

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की, रविंद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासह अनेक मान्यवरांचे खूप मोठे योगदान आहे. धर्म निरपेक्ष लोकशाहीच्या पायावर देशाची चांगली स्थिती आहे. कोकणात स्वातंत्र्य लढ्यात अनेकांनी सहभाग प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे घेतला. आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक मार्गांनी भारतीय समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. १९ आणि २० मार्च १९२७ ला महाड येथील चवदार तळ्यासाठी सत्याग्रह केला. स्वातंत्र्य लढ्यात तुरुंगवास भोगलेले कोकणचे गांधी म्हणून ओळख असणारे आप्पासाहेब पटवर्धन यांनी गोपूरी येथे आश्रम उभा करून एक नवा संदेश यातून दिला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देखील आप्पासाहेबांनी स्वच्छतेचे व्रत कायम ठेवले. हे विशेष होय. १९३२ च्या नागपूरातील झेंडा सत्याग्रह हा प्रमाणे रत्नागिरीमध्ये त्यांनी सत्याग्रह केला. दारुबंदी, कुणबीसेवा संघ, भारत सफाई मंडळ असे अनेक नवे प्रयोग याच काळात घडले.

कोकणातील खोत परंपरा खूप जुनी आहे. डॉ.बाबासाहेब बोटे यांनी खोत कुळांची गाऱ्हाणी मांडली. शेतकरी चळवळीत त्यांचे योगदान खूप होते. धान्य परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांनी न्याय मिळवून दिला. कोकणातील प्रजासत्ताकाचा पहिला क्रांती लढा वासुदेव बळवंत फडके यांनी दिला होता. वासुदेव बळवंत फडके यांनी स्वातंत्र्यासाठी केलेले योगदान हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. श्रीपाद डांगे, सुरेंद्रनाथ टिपणीस, ना.ना.पाटील, अनंतराव चित्रे, क्रांतिवीर बळवंत वासुदेव फडके, हु.जोशी मामलेदार, पनवेलचे बाबुराव आपटे,आप्पासाहेब वेदक, नामाजी गोपाळ मोकल,सत्याग्रही धनाजी जोमा म्हात्रे, नारायण नागू पाटील, दादासो करंदीकर, भास्कर दामले, पी.एन.धारप, दादासो रेगे, गुप्ते, तेंडूलकर, गोडबोले, नथु टेकावले, अर्जून भोई, वसंत दाते, कमलाकर दांडेकर, अण्णासाहेब सावंत, कुलाबा जिल्हयाचे हिरवे गुरुजी, शेवनाथ नानाभाई वाडेकर, राजाभाऊ चांदोरकर, रामभाऊ साठे, नानासो कुंटे, विष्णुपंत पेंडसे, विष्णुपंत परांजपे, भास्करराव दिघे, वासुकाका पेंडसे, श्रीपाद चौधरी, बापूसाहेब गद्रे, भाई कोतवाल उर्फ विठ्ठलराव लक्ष्मणराव कोतवाल, अशी कितीतरी थोर मंडळी वेगवेगळ्या क्षेत्रात दमदार कामगिरी करीत होते. महाडच्या स्वराज्याचा लढा देणारे नाना पुरोहित यांचेही नांव आवर्जून घ्यावे लागेल. मोहन धारिया यांनी संस्थान मुक्तीचा अहिंसात्मक लढ्यात मोठ योगदान दिले आहे.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी असहकार आंदोलन सुरु होते. त्यात कोकण विभाग मागे नव्हता.१९३०-३२ च्या मिठाचा कायदेभंग असो की, १९४१ चा वैयक्तिक सत्याग्रह आणि निर्णायक लढा म्हणून ज्या कडे पाहिले जाते. त्या १९४२ च्या चले जाव आंदोलनात कोकणाने राष्ट्रसाठी लढा दिला. त्याची नोंद आजही अनेक ठिकाणी आढळते.

अगदी पालघर, बोर्डी, घणसोलीपासून थेट गोव्याच्या शेजारी असणाऱ्या शिरोड्यापर्यंत ही चववळ अधिक सक्रिय पध्दतीने एकसंघ भावनेने झाली होती. या इतिहासाच्या पाऊलखूणा आजही जपल्या आहेत. एकीकडे स्वातंत्र्याची चळवळ जोर धरत असतांनाच १९४२ च्या आंदोलनात शेतकऱ्यांनी घेतलेला सहभाग आणि आयोजित केलेल्या परिषदा यांचे महत्व अनन्य साधारण असे आहे. पंधरा पोलीस त्या काळात आडवे करण्यात यश आले होते. ना.ना. पाटील यांनी खूप आठवणी पुस्तक स्वरुपात मांडल्या आहेत. भूमिगत चळवळीतही कोकणी तरूण मागे नव्हता. महात्मा गांधी ते लोकमान्य टिळक या परंपरेप्रमाणे कोकणात स्वातंत्र्य चळवळीत सर्व स्तरावरील लोक सहभागी झाले होते हे विशेष होय! स्वातंत्र्य चळवळीत कोकणचे योगदान केवळ एका लेखात समाविष्ट होणारे नाही, म्हणून हा लेख म्हणजे एक सुरुवात आहे. अमृत वर्षाच्या निमित्ताने याच विषयावर अधिकाधिक माहिती लेखाद्वारे देण्याचा आमचा प्रयत्न आहे, नव्या पिढीकडून स्वागत होईल ही अपेक्षा.

डॉ.गणेश मुळे
उपसंचालक (माहिती)
कोकण विभाग, नवी मुंबई

तरुणाची कळंब जवळ विहिरीत उडी मारून आत्महत्या

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत तालुक्यातील कळंब ग्रामपंचायत मधील चाहुचीवाडी येथील विहिरींमध्ये एका २२ वर्षीय तरुणाने उडी घेऊन आत्महत्या करून स्वतःला संपवून टाकले.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील पाटगाव येथील राहणारा दशरथ रघुनाथ बनसोडे हा २२ वर्षीय तरुण सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करतो.१२ ऑक्टोबर रोजी त्याचा पगार झाला होता आणि त्याने पगाराच्या पैशातून घरातील किराणा साहित्य खरेदी करून नेले होते.सायंकाळी साडे पाच वाजता हा तरुण घरातून बाहेर निघाला त्यावेळी मोबाईल, पाकीट आणि बाईक न घेता पायी चालत गावाबाहेर आला.पाटगाव गाव हे कर्जत तालुका आणि रायगड जिल्हा हद्दीपासून जेमतेम एक किलोमीटर अंतरावर आहे. पुढे कर्जत तालुका हद्दीत मुरबाड-कर्जत राज्यमार्ग रस्त्याने चालत चालत हा तरुण चाहुचीवाडी येथील उतारावर रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीजवळ आला. सायंकाळ होत आल्याने अंधार पडत असताना आजूबाजूला कोणी नाही याची खात्री करून त्या तरुणाने विहिरीत उडी मारून स्वतःला संपवून टाकले.

पाऊस अजूनही सुरू असल्याने चाहुचीवाडी येथे रस्त्याच्या कडेला शेतात असलेली ती विहीर काठोकाठ पाण्याने भरलेली आहे.आज सकाळी काही आदिवासी त्या विहिरीवर पाणी आणण्यासाठी आले असता त्यांना कोणाचे प्रेत विहिरीतील पाण्यावर तरंगले असल्याचे दिसून आले.त्यामुळे त्या तरुणांनी कळंब येथे जाऊन पोलिसांना त्याबाबत माहिती दिली. पोलीसांनी स्थानिक आदिवासी तरुणांच्या मदतीने त्या तरुणाचा मृतदेह बाहेर काढला आणि मृतदेहाची ओळख पटावी यासाठी मृतदेहाचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला. ते फोटो बघून पाटगाव येथील रघुनाथ बनसोडे आणि त्यांचे कुटुंबीय हे अर्ध्या तासात चाहुचीवाडी येथे आले.त्यांनी तो मृतदेह दशरथ बनसोडे याचाच असल्याचे मान्य केले आहे.

नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, पोलीस उपनिरीक्षक गिरीश भालचीम,सहायक पोलिस उपनिरीक्षक शेमडे तसेच पोलोस नाईक समीर भोईर,निलेश वाणी,गिरी आदी उपस्थित होते.

दशरथ बनसोडे या अविवाहित तरुणाने घरातून आत्महत्या करण्याचे इराद्याने घराबाहेर पडून पाण्याने भरलेल्या विहिरीत उफी मारून स्वतःला संपविले असे नेरळ पोलीस स्टेशन मधील पोलीस डायरीत नोंद केली आहे.

प्रा.आरोग्य केंद्राना ऑँक्सिजन मशीन भेट

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

नवरात्री उत्सवाचे उत्सवाचे औचित्य साधुन आश्रय सामजिक शैक्षणिक संस्थेच्या मार्फत रायगड रोहा येथे ३ प्राथमिक आरोग्य केंद्राना ऑक्सिजन मशीन भेट देण्यात आल्या.

गेल्या २ वर्षापासून कोरोना सारख्या महाभयंकर आजाराने बरेच जीव गमावले. ते फक्त ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे. खास करुन ग्रामीण भागात प्रा.आरोग्य केंद्र येथे ऑक्सिजनची असलेली कमतरता. ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेला योग्य प्रकारे उपचार व्हावे याकरीता आश्रय सामजिक संस्थेमार्फत हा उपक्रम रोहे तालुक्यातील प्रा.आरोग्य केंद्र उपजिल्हा रूग्णालय रोहा,प्रा. आरोग्य केंद्र नागोठणे व आंबेवाडी-कोलाड येथील प्रा. आरोग्य केंद्रात राबविण्यात आला.यावेळी संस्थेचे संस्थापक दीपक नाईक, रायगड जिल्हाध्यक्ष प्रमोद पार्टे, विनायक मेढे कार्यकारी संपादक पोलिस बातमी पत्र,गुरुप्रसाद नाईक संस्थापक आश्रय ट्रस्ट सचिव ,रवींद्र तारु तंटामुक्ती अध्यक्ष, रोशन पडवल, आणि सर्व ग्रामस्थ व प्राथमिक आरोग्य केंद्र येथिल वैद्यकिय अधिकारी तसेच कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान कोरोना सारख्या महाभयंकर आपत्तीकाळात आश्रय सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे समाजातील सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.



जाहीर नोटीस

आमचे अशिलाचे वतीने तमाम जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी श्रीमती.सोनाली करण भोईर व श्रीमती. कमल करण भोईर यांच्या मालकीचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाबाधितांना पुर्नवसन व पुःर्नस्थापन योजनेंतर्गत त्यांना सिडकोच्या साडेबावीस टक्के योजनेनुसार पुष्पक वडघर नोड, येथील वाटप भूखंड संचिका क्रमांक KOL-ICOGS-176 N नुसार सिडको पुष्पक नोड, वडघर येथील सेक्टर R3, भूखंड क्रमांक 34 A, क्षेत्र ११० (चौ.मी.) हा वाटप करण्यात आलेला आहे. या भूखंडाचे सर्व हक्क व अधिकार व फायदे कायमस्वरुपी आमचे अशिल १) श्री.राम बाळाराम पाटील, २) श्री.प्रदीप तुकाराम मुंडकर, ३) श्री.शिवदास अंबाजी ढमाले यांना हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे.

सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत भाडेपट्ट्याचे व इतर सर्व हक्क अधिकार हस्तांतरीत करणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खाालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा कार्यालयीन पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीमधील त्यांचा हिस्सा निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदार यांच्या बरोबर विक्री व हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १४/१०/२०२१

सही/-
सौ.हर्षदा एस. गडकर
(अॅडव्होकेट हायकोर्ट)
ऑ.पत्ता : श्री. सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स,
गाळा क्र.१२, प्लॉट नं.४२२, तक्का पनवेल,
जि.रायगड, पिन नं.४१०२०६

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, विठाबाई गणपत वास्कर, रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल यांच्या नावे मौजे : दापोली येथील भूखंड क्रमांक एफ-११ (२३६), सेक्टर ३, एकूण क्षेत्र ४७० चौ.मी., नोड पुष्पक नगर दापोली, तालुका : पनवेल, जि.रायगड हा भूखंड सिडकोने दि.२७/०६/२०१६ रोजीच्या अॅग्रीमेंन्ट टु लीज / भाडेपट्टाच्या दस्ताद्वारे हस्तांतरीत केलेला आहे. सदरहू दस्त मा.सह दुय्यम निबंधक पनवेल क्र.५ यांचे कार्यालयात दि.२८/०६/२०१६ रोजी अनुक्रमांक ४९९४/२०१६ कडे नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. आमचे अशिल मे.चंचलदास इन्व्हेस्टमेन्ट ग्रुप तर्फे प्रोप्रा.श्री.अभिषेक सुरेश असरानी यांनी खाली वर्णन केलेली मिळकत / भूखंड हा, त्या मिळकतींचे विद्यमान मालक / भाडेपट्टादार यांचेकडून सिडकोसोबतचे त्रिपक्षीय भाडेपट्टा हस्तांतरण करारनाम्याद्वारे हस्तांतरीत / खरेदी करण्याचे ठरविले आहे.

नोड	भूखंड क्रमांक	सेक्टर क्रमांक	क्षेत्र (चौ.मी.)
पुष्पकनगर, दापोली, ता.पनवेल, जि.रायगड	एफ-११ (२३६)	३	४७० चौ.मी.

उपरोक्त भूखंड / मिळकतींबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, वारस हितसंबंध, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, बक्षिस, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, भूखंड विक्रीचा करार, खरेदीखत, मेन्टेनन्स मेहेर, हक्कसोड, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, दावा, तक्रार, अॅटेचमेंट, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात त्यासंबंधी लेखी निवेदन अथवा हरकत कागदोपत्री पुराव्यासह द्यावी, याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व सदर भूखंडामध्ये कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल सदर भूखंड हस्तांतरीत करून घेतील, त्यानंतर सदर मिळकतीचा संपूर्ण उपभोग घेण्याचा आमचे अशिलांना अधिकार राहील व तसे त्यांना सदर मिळकतीचे टायटल क्लिअरन्स सर्टीफिकेट अॅण्ड सर्च रिपोर्टही देण्यात येईल व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखलाही दिला जाईल. मुदतीनंतर आलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

दि.१४/१०/२०२१

सही/-
अॅड.प्राचाली श्रीरंग पाटील
२०२, शिवदिशा कॉम्प्लेक्स, भूखंड क्रमांक
११९, सेक्टर २३, उलवे, नवी मुंबई-४१०२०६
मो.नं.७२०८३३२३१८

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.संपतराव शिवाजीराव पाटील वगैरे ७ यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदरची मिळकत ही बिनशेती स्वरुपाची आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड

मालक/कब्जेदाराचे नांव	सर्व्हे नंबर	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार रु.पै.
संपतराव शिवाजीराव पाटील वगैरे ७	१५४/४	३५४ चौ.मी.	३५.४०

मौजे : पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.सपंतराव शिवाजीराव पाटील वगैरे ७ यांची वरील नमूद बिनशेती मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१४/१०/२०२१

सही/-
मयुरेश प्र.हनुमंते
अॅडव्होकेट-हायकोर्ट
शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,
ठाणा नाका, रोड, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८२८६१२१३३३

PUBLIC NOTICE

Be it known to the General Public my client MR. RAJESH GOVIND MANAJI is owner, seized, possessed the immoveable property bearing Plot No.B20/30, Near Vision Bldg. Sector-7, Khanda Colony, New Panvel, Tal - Panvel, Dist- Raigad My client has lost and or misplaced the following original documents:

1) Allotment letter dated 08/09/1997 issued by CIDCO Ltd to Smt. Sarojdevi Shivram

2) Agreement to Lease dated 27/01/2001 executed between CIDCO Ltd and Smt. Sarojdevi Shivram alongwith Registration receipt under document no PVL-8666-2001

3) Occupancy Certificate Dt. 27/06/2002 issued by CIDCO Ltd

4) Agreement To Sale dated 04/01/2007 executed between Smt. Sarojdevi Shivram and Mr. Md. Akram alongwith Index-II and registration receipt under document no PVL-2 120-2007

5) Transfer NOC dated 08/01/2007 issued by CIDCO Ltd

6) Transfer of Lease by way of Assignment dated 21/03/2007 executed between Smt. Sarojdevi Shivram and Mr. Md. Akram alongwith Index-II and registration receipt under document no. URAN (PVL-2)/2335-2007

7) Final Order for Transfer dated 29/03/2007 issued by CIDCO Ltd in name of Mr. Md. Akram

My client has lodged the Complaint on 13/10/2021 at Khandeshwar Police Station, New Panvel under Lost Property Registration No.1484/2021 It is informed that not to use the above document for any purposes. If it is misused strict legal action will be initiated. If any person or persons found the said document, kindly be return to undersigned. proper charges will be paid to the concern person. It is further informed that after the period of 7 days from Notice no claim of whatsoever will be entertain.

Sd/-
KUSUM KIRAN GHARAT
Advocate & Notary (Govt. Of India
Shop No.1, Hemkunj Building,
Plot No.22, Sector -8,
Near Bank Of India,
Khanda Colony, New Panvel,
Navi Mumbai 410 206.
Ph. No. 9967335046

आदिती तटकरे यांच्या हस्ते चिंचवली बस स्थानकाचा लोकार्पण सोहळा

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान तर्फे आणि सामाजिक कार्यकर्ते राकेश शिंदे यांच्या संकल्पनेतून बांधण्यात आलेल्या चिंचवली एस. टी. थांब्याचा लोकार्पण सोहळा रायगड च्या पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्या हस्ते आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून करण्यात आला.

यावेळी जि.प. सदस्य दयाराम पवार, भाई टके, राकेश शिंदे, महेंद्र पोटफोडे , नरेंद्र जाधव, आंबेवाडी सरपंच सुरेश महाबळे, उपसरपंच श्रीकांत चव्हाण, गणेश वाचकवडे मनोज शिर्के, दर्शन तेलंगे, चिंचवली सरपंच दर्शना पवार, प्रसाद येरुणकर, शिरिष येरुणकर, महेश येरुणकर, सुनिता मालुसरे, उषा मालुसरे, वैशाली मालुसरे, चंद्रकांत मालूसरे, दयाराम भोसले तसेच चिंचवली येथील महिला ग्रामस्थ त्यांचप्रमाणे विविध परिसरातील कार्यकर्ते जेष्ठ नागरिक त्याचप्रमाणे सुतारवाडी येथील मोहन दोशी, पोलीस पाटील संतोष दळवी, सामाजिक कार्यकर्ते चिंतामण दळवी उपस्थित होते.

चिंचवली तसेच अन्य परिसरातील प्रवाशांसाठी बस थांब्याची व्यवस्था करून दिल्याबद्दल बेंडू येरुणकर यांनी आभार मानले.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां.विभाग, पनवेल
पिन कोड-४१०२०६
ई-निविदा सूचना क्र.५० सन २०२१-२२

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल दूरध्वनी / फॅक्स क्रमांक ०२२-२७४५२७७८/ ०२२-२७४६७४४० महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे कंत्राटदाराला खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत (रु.लक्ष)	इसारा रक्कम (रुपये)	नोंदणी वर्ग	ई-निविदा संचाची किंमत जीएसटी धरुन	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कामाचे लेखाशिर्षक
१	पनवेल वावंजे रस्ता रामा-८५ किमी ७/६०० व ८/६०० मध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण पेव्हमेंन्ट सुधारणा करणे ता.पनवेल, जि.रायगड	२०८.७३	१५००००/-	अनिवार्य नाही	२२४०.००	०६ महिने	(५०५४०३४९)-०३

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १८/१०/२०२१ ते दिनांक ०१/११/२०२१
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक ०९/११/२०२१ अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालया दु.१५.३० उघडण्यात येईल.
निविदा पूर्व बैठक : दिनांक २६/१०/२०२१ दुपारी १५.०० वाजता अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

टिप :-

१) सर्वपात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदाप्रणाली https://mahatenders.gov.in

२) निविदाकारांना नमूद केलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजिटल प्रमाणपत्र वितरित व Portal वर Enrollment करण्या संदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
Toll Free No.180030702232, Email : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in

३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा / बयाणा रक्कम, ई-निविदासंचाची किंमत याबाबतचे दस्ताऐवजाच्या मुळप्रती स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत नुसार करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४) सादर केलेल्या निविदा कागदपत्राची प्रत स्वतंत्र पाकिटात दिनांक ०१/११/२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.

५) शासन निर्णयानुसार निम्नत्तम निविदाकारांचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security) चा DD/FDR/B.G लिफाफा क्र.२ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नत्तम निविदाकारांची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व सदर निविदाकारास पूर्ण एक वर्षासाठी कोणत्याही निविदा प्रक्रियेस सहभागी होता येणार नाही तसेच अशा निविदा नव्याने मागविण्यात येतील.

६) इतर अटी व शर्ती ई-निविदामध्ये पहावयास मिळतील.

७) सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

वरील कामाची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेट वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
सा.बां.विभाग, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

श्री धावीर महाराज देवस्थानाच्या जागेवरील सीमाशुल्क विभागाचे आरक्षण हटणार

सुनिल तटकरे यांनी सीमाशुल्क विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला व ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती सीमाशुल्क विभागाला केली.

यानुषंगाने दि.१४ ऑक्टोबर २०२१ रोजी खा.सुनिल तटकरे यांच्यासमवेत सीमाशुल्क आयुक्त व इतर संबंधित अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत सीमाशुल्क आयुक्तांनी ही जागा पुन्हा श्री.धावीर महाराज देवस्थान ट्रस्टला देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. लवकरच ही कार्यवाही पूर्ण होईल, असा विश्वास खासदार सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

दिवंगत सुरेखा सुभेकर यांच्या तृतीय स्मृती दिनानिमित्त आरोग्य शिबिर

दै.रायगड नगरी । वाकण

लायन्स क्लबच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम घेताना बुधवार, दि १३ ऑक्टोबर २०२१ रोजी दिवंगत सुरेखा सुभेकर यांचा तृतीय स्मृती दिन साजरा करण्यात आला .

लायन विवेक सुभेकर यांच्या मातोश्री दिवंगत सुरेखा सुभेकर यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून आरोग्य शिबीर व अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला . नेहमीच्या पद्धतीने चालणाऱ्या गोष्टींना वळण देत व कालानुरुप आपल्या परंपरेत बदल करीत एक वेगळ्या पद्धतीने स्मृती दिन साजरा केला.

यावेळी अंगणवाडी सेविका यांना 'ग्रामीण महिलांचे आरोग्य ' यावर मार्गदशन सन्माननीय एमजेएफ लायन वैद्य यशवंत चित्रे यांनी विवीध आजारांवर झाड पाला सारखी आयुर्वेदीक औषध कशी घ्यावी व कशा प्रकारे असावीत यावर विस्तृतपणे सांगीतले . याच्या संपुर्ण टिप्स व प्रिन्टेड नोटस् देवून या सेविकांना महत्वाची मोलाची माहीती दिली. यावेळी त्यांचे प्रश्न, त्यांचे आजार याचेही निदान करून त्यांना त्यावर उपाय सांगीतला. यावेळी अंगणवाडी सेविकांच्या मुख्याधिकारी श्रीमती भाकरे यांनी आपल्या मनोगतात लायन्स क्लबचे व लायन यशवंत चित्रे यांचे आभार मानले व यापुढे हाच कार्यक्रम आमच्या इतर विभागातील सेविकांसाठीही राबवावा हे सांगीतले. या प्रसंगी डायबीटीस तज्ञ वैद्य शर्मा यांनीही मधुमेहावर मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमास प्राथमिक शाळेच्या शिक्षिका श्रीमती सैंदाणे व सौ स्वाती पाटील यांच मोलाच सहकार्य मिळाले . यावेळी सोबत लायन सभासद अध्यक्ष लायन सुजित महागावकर, चार्टड प्रेसिडेंट लायन प्रकाश जैन, खजिनदार लायन संतोष शहासने, डायरेक्टर - लायन सुजाता जवके, लायन दौलत मोदी, लायन संतोष मांडवर, लायन स्वप्नाली मांडवकर, लायन श्वेता सुभेकर, लायन अनिल गिते, लायन विशाल शिंदे, लायन लेडी प्राची महागावकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी केले.

दसरा (विजयादशमी)

हिंदू संस्कृतीत खूप महत्व असलेला व मोठा सण दसरा हा आश्विन शुद्ध दशमीला येतो. आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवसापासून नऊ दिवस नवरात्र उत्सव सुरू असतो. त्यांनंतरचा दहावा दिवस म्हणजेच 'दसरा', याच सणाला विजयादशमी असेही म्हणतात. दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त मानतात. कोणत्याही मंगल कार्याचा किंवा कोणत्याही नवीन कामाचा श्री-गणेशा या दिवशी करतात. लहान मुलांकडून ह्या दिवशी सरस्वतीपूजन करून शिक्षणाचा प्रारंभ करतात.

'दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' या काव्यातच ह्या सणाची महती गौरवलेली आहे. दसरा हा पराक्रमाचा, पौरुषाचा सण आहे. या सणात चातुर्वर्ण एकत्र आलेले दिसतात. या दिवशी सरस्वतीपूजन व शस्त्रपूजन केले जाते.

दसरा या सणाची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. याच दिवशी देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला. प्रभू रामचंद्र याच दिवशी रावणावर स्वारी करायला निघाले. पांडव अज्ञातवासात राहण्याकरिता ज्या वेळी विराटच्या घरी गेले, त्या वेळी त्यांनी आपली शास्त्रे शमीच्या झाडावर ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर त्यांनी तेथील शास्त्रे परत घेतली व त्या झाडाची पूजा केली, तो हाच दिवस.

शिवाजी महाराजांनी प्रतापगड किल्लयावर भवानी देवीच्या उत्सवाला याच दिवशी प्रारंभ केला. पेशवाईतसुद्धा या सणाचे महत्व मोठे होते. बाजीराव पेशवे याच दिवशी पुढच्या स्वारीचे बेत कायम करीत. अनेक शूर, पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राजावर स्वारी करण्यास जात असत. त्याला सीमोल्लंघन म्हणत. दसरा म्हणजेच विजयादशमी . हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. विजयादशमी म्हणजे हमखास विजय मिळवून देणारा दिवस.

फार वर्षांपूर्वी वरतंतू नावाचे ऋषी होऊन गेले. त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठी खूप विद्यार्थी येत. अभ्यास करून मोठे होत. त्या वेळी मानधन किंवा फी नव्हती. त्यामुळे शिक्षण संपल्यावर विद्यार्थी गुरुदक्षिणा देत. या ऋषींकडे 'कौत्स' नावाचा एक शिष्य होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूंनी त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. त्याने ऋषींना विचारले कि, मी तुम्हाला गुरुदक्षिणा काय देऊ ? तुम्ही मागाल ते मी देईन. ऋषींनी कौत्साची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. त्यांनी कौत्साला प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी सुवर्णमुद्रा, याप्रमाणे १४ विद्यांबद्दल १४ कोटी सुवर्णमुद्रा आणावयास सांगितल्या.

कौत्स हे ऐकून गांगरून गेला. तो रघुराजाकडे गेला. परंतु राजाने त्याच वेळी विश्वजित यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता, तरीसुद्धा राजाने कौत्साकडे तीन दिवसांची मुदत मागितली आणि त्याने इंद्रावर स्वारी करण्याचे निश्चित केले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहित होता. त्याने कुबेराला सारी हकीकत सांगितली. इंद्राने आपट्याच्या पानांची, सोन्याची नाणी बनवून, ती पावसासारखी राजाच्या राजवाड्यात पाडली. कौत्स त्या सुवर्णमुद्रा घेऊन, वरतंतू ऋषींकडे गेला व गुरुदक्षिणा घेण्यास विनंती केली. परंतु ऋषींनी त्यापैकी १४ कोटी सुवर्णमुद्रा परत घेण्यास राजाने नकार दिल्यामुळे कौत्साने त्या मुद्रा आपट्याच्या झाडाखाली ठेवून, लोकांना लुटायला सांगितल्या. लोकानीं त्या वृक्षाची पूजा केली व पाहिजे तेवढ्या मुद्रा लुटल्या. तो दिवस दसऱ्याचा होता. म्हणून त्या दिवसापासून त्या झाडाची पूजा करून सोन्याची पाने लुटण्याची प्रथा सुरु झाली.

साधुसंत येता घरा, तोचि दिवाळी-दसरा ! या तुकाराम महाराजांच्या उक्तीत दोन सणांचा अजोड असा उल्लेख केला आहे व तो योग्यच आहे. या दिवशी शमी वृक्षाची पूजा केली जाते. रामाने रावणाशी युध्द करून त्याचा वध केला व वनवासात जाताना शमीच्या वृक्षाच्या ढोलीत ठेवलेली शस्त्रास्त्रे परत ताब्यात घेतली म्हणून शमीच्या वृक्षाला या दिवशी महत्त्व आहे. उत्तरभारतात या दिवशी रावणाची प्रतिमा जाळण्याची प्रथा आहे. वनवासाला जाताना सीतेचे सुवर्ण अलंकार आपटयाच्या झाडामधे ठेवले होते असे मानतात. म्हणून आपटयाची पाने सोने म्हणून सर्वांना वाटतात. या दिवशी वाहनांचीही पूजा करतात.

या दिवशी घरातील कर्त्या पुरूषांनी सीमोल्लंघन करावयाचे असते. सोने घेऊन देवीचे दर्शन घ्यावयाचे. घरी आल्यावर बहिणीने अथवा घरांतील मुख्य जी सवाष्ण स्त्री असेल तिच्याकडून ओवाळून घ्यायचे असा प्रघात आहे. पूर्वी साम्राज्य वर्धनाच्या दृष्टीने ज्या मोहिमा आखल्या जात त्यांची सुरुवात या दिवशीच्या सीमोल्लंघनाने होत असे.

घन:श्याम कडू
उरण-रायगड

उरण येथे विद्यार्थीनींसाठी तारुण्याच्या वाटेवर या विषयावर व्याख्यान शिबीर संपन्न

दै.रायगड नगरी । उरण

नवदुर्गा नवरात्रौत्सव मंडळ, बोरी आणि यु.ई.एस. स्कूलच्या संयुक्त विद्यमाने ज्युनिअर व सिनीअर कॉलेजच्या विद्यार्थीनींसाठी तारुण्याच्या वाटेवर या विषयावर व्याख्यान शिबीर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.माधवी गोसावी ह्यांच्या भाषणाने झाली. ज्यात त्यांनी विद्यार्थीनीना आपल्या अनुभवाचे बोल सांगितले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. पराग कारोळकर ह्यांनीही खुमासदार शैलीत तारुण्याच्या वाटेवरच्या महत्त्वाच्या गोष्टी विद्यार्थीनींना उलगडून सांगितल्या.

यावेळी यु.ई.एस.चे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, माजी अध्यक्ष व सदस्य डव्होकेट राजेंद्र भानुशाली, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सौ. सोनाली म्हात्रे, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सौ. सिमरन दहिया, माध्यमिक, प्राथमिक व पुर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका, सिनिअर कॉलेजच्या एचओडी तसेच 'राष्ट्रीय सेवा योजना' कार्यक्रम अधिकारीआणि ज्युनिअर व सिनीअर कॉलेजच्या विद्यार्थीनी, शिक्षक व कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. पराग कारोळकर केडीएस कॉलेज उरण, त्यांच्यासोबत डॉ.माधवी गोसावी ,चाईल्ड केअर कन्सलटंट, उलवे , अतुल ठाकुर नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ अध्यक्ष व नगरसेवक, नंदन पानसरे, संतोष पवार व इतर पदाधिकारी ह्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गाव व वाड्या होणार प्लास्टिक मुक्त ; जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गाव आणि वाड्या प्लास्टिक मुक्त होणार आहेत. ग्रामपंचायत, ५ठ मुंबई व जिल्हा परिषदेच्या सहाय्याने जिल्ह्यातील हा पहिला पथदर्शी प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाची माहिती आणि नियोजनसाठी २१ गणपती सभागृहात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. हा उपक्रम राबविण्याचे आश्वासन उपस्थित सर्व महिलांनी दिले.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. हा प्रकल्प जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प असू शकतो. याद्वारे संपूर्ण गाव प्लास्टिक मुक्त होऊन पर्यावरणाचे संरक्षण आणि कचरा व्यवस्थापन उत्तम प्रकारे घडेल. असे डॉ. किरण पाटील म्हणाले. तसेच ग्रामपंचायतीच्या विविध कामाचे कौतुक केले.

जिल्हा परिषद रायगड पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाचे जयवंत गायकवाड म्हणाले की प्लास्टिक मुक्त ग्रामपंचायतसाठी सिद्धेश्वर ग्रामपंचायतीने जे पाऊल उचलले आहे ते संपूर्ण जिल्ह्यासाठी दिशादर्शक आणि आदर्शवत आहे. या दोन्ही मुळे उपस्थित ग्रामपंचायत टीम , शिक्षक , महिला ग्राम संघातील सर्व बचत गट महिला ग्रामस्थ यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

५ठ संस्थेच्या स्मिता बिरकर यांनी कोणते व कसे प्लास्टिक गोळा करायचे ते बाहेर फेकल्याने त्याचे पर्यावरण, वन्य व पाळीव जनावरांवर होणारे दुष्परिणाम याची माहिती दिली. शिवाय गोळा झालेलं प्लास्टिक अधिकृत पुनर्प्रक्रियेसाठी घेऊन जाण्याविषयी ग्रामपंचायत बरोबर नियोजन केले.

याबरोबर पंचायत समिती सुधागड गटविकास अधिकारी विजय यादव, सरपंच उमेश यादव, स्वदेश फाउंडेशन चे श्री. पाटील, प्राइड इंडिया श्री मोरे सर, रायगड प्रदूषण मंडळ कमिटी सदस्य प्रमोद राईलकर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत ग्रामसेवक ए. टी. गोरड, शिक्षक रमाकांत शिंदे, लक्ष्मण चव्हान, ५ठ चे सच्छिदानंद चतुर्वेदी, सुशील बिरकर, मिचेल कपाडिया, पूजा भौड, ग्रामसंघ सीआरपी स्नेहा यादव, प्रची कदम तसेच सचिन मुंढे, संध्या यादव, गणेश महाले आणि मनमुक्त फाउंडेशनचे प्रफुल सुतार यांनी विशेष मेहनत घेतली.

या प्रसंगी उपसरपंच योगेश सूरावकर, सदस्य नथुराम चोरघे, रजनी जाधव, विद्या यादव, संजना फाळे, गौरी वाघमारे, स्वदेश समिती सदस्य व प्राइड इंडिया प्रतिनिधी, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष मयूर कारखानीस, ग्रामस्थ व सर्व महिला उपस्थित होत्या.

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे माझे पक्षकाराचे वतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मुळ भूखंड मालक १) श्री.दिनेश मिननाथ पाटील, २) ललिता नाथा पाटील उर्फ ललिता गोपीनाथ फडके, ३) श्री.समाधान रामचंद्र पाटील यांचे ताबा कब्जात व वहिवाटीत रोड-पुष्पक/वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा भूखंड आहे. त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे...

भूखंडाचे वर्णन

नोड : पुष्पक/वडघर, ता.पनवेल, जि.रायगड

भूखंड मालकाचे नाव	संचिका क्र.	सेक्टर क्र.	भूखंड क्रं.	क्षेत्र
१) श्री.दिनेश मिननाथ पाटील २) ललिता नाथा पाटील उर्फ ललिता गोपीनाथ फडके ३) श्री.समाधान रामचंद्र पाटील	**केओपी-आयसी आयजी-५२**	**आर-४**	**१४७**	**२९० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडामधील अविभाज्य हिस्सा**

सदर आमचे पक्षकार ललिता नाथा पाटील उर्फ ललिता गोपीनाथ फडके यांनी वर वर्णनाचा भूखंड क्षेत्र २९० चौ.मी. क्षेत्रापैकी यांचा असलेला अविभाज्य हिस्सा आमचे पक्षकाराचा भाऊ १) श्री.दिनेश मिननाथ पाटील यांना बक्षिसपत्राद्वारे देणार आहेत. तरी सदरहू मिळकतीवर / भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार वकीलांच्या पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे / भूखंडाचे बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/१०/२०२१

सही/-
ॲड.कैलास नारायण घरत
००२, प्राईड सी.एच.एस.लि., सेक्टर ११, भूखंड क्रं.०५, माथेरान रोड,
नवीन पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९५९४६५३७७७

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.अश्विनी केसरे

जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१२२५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/११/२०२१

१) कु.सायली प्रदीप चौघुले
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
२) श्रीमती.तेजस्विनी प्रदीप चौघुले
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.ओम प्रदीप चौघुले
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.फ्लॅट नं.३०४, बी विंग, तिसरा मजला,
शांतीवन सोसायटी, प्लॉट नं.ई/३७, सेक्टर ४,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

वरील अर्जदार नं.२ यांचे पती व अर्जदार नं.१ व ३ यांचे वडील कै. प्रदीप सहदेव चौघुले यांचे दि.२१/०८/२०२० रोजी महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल, सेक्टर ६, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई येथे निधन झाले. मयत कै.प्रदीप सहदेव चौघुले यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट नं.३०४, बी विंग, तिसरा मजला, शांतीवन सोसायटी, प्लॉट नं.ई/३७, सेक्टर ४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड.
मुल्यांकन ३,५७,६९४/-
(रुपये तीन लाख सत्तावन हजार सहाशे चौऱ्यानव्व)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

अर्जदारातर्फे वकील
ॲड.सागर गोंधळी

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर साो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.१०९०/२०२१
ने.ता.१५/११/२०२१

श्री.अकील इकबाल पटेल
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांची मावशी कै.हाजराबीबी अ.गफूर तांबडे ही दि.०२/०६/१९९४ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील तिच्या राहत्या घरी मृत्यू पावलेली / झालेला आहे. अर्जदार यांची मावशी कै.हाजीराबीबी अ.गफूर तांबडे हिच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी संबंधित महानगरपालिका यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मृत्यूचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांचे त्यांचे विनंतीप्रमाणे मृत्यूचा दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१४ माहे १० सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

राव साहेब

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१४१९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/१२/२०२१

१) श्रीमती.सीमा भागवत जाधव
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.राजेंद्र भागवत जाधव
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही रा.१०४, सुशिल गार्डन-२, काळण समाज
हॉलजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.कादंबरी स्वप्नील चौलकर
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ग्रामपंचायत गुळसुंदे जवळ,
गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ यांचे पती व नं.२ व ३ यांचे वडील कै.भागवत दगडू जाधव हे दि.१०/०५/२०१९ रोजी मयत झाले असून कै.भागवत दगडू जाधव यांच्या नावाने मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड पनवेल येथील महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाची सदनिका असून सदर सदनिकेचे कै.भागवत दगडू जाधव हे रितसर मालक आहेत.

सदनिकेचे वर्णन
मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
फ्लॅट (सदनिका) क्र.१०४, सुशिल गार्डन-२, पहिला मजला, काळण समाज हॉलजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
क्षेत्र ६६२ चौ.फूट कारपेट व ९७ चौ.फूट टेरेस
पनवेल महानगरपालिकेच्या दप्तरी नोंदीत असलेली.

येणेप्रमाणे सदनिकेचे वर्णन असून सदरहू सदनिकेच्या अनुषंगाने कै.भागवत दगडू जाधव यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.भागवत दगडू जाधव यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.भागवत दगडू जाधव यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१४/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.भाकरे साहेब

अर्जदारतर्फे वकील
ॲड.प्रदीप एस. सावंत

जाहीर नोटीस

मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर साो, पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.२०२/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्रीमती.सविता पंढरीनाथ पाटील
वय वर्षे : ४०, धंदा : गृहिणी
२) श्री.योगेश पंढरीनाथ पाटील
वय वर्षे : ३१, धंदा : शेती / नोकरी
३) श्री.चेतन पंढरीनाथ पाटील
वय वर्षे : ३०, धंदा : शेती / नोकरी
४) कु.प्रणाली पंढरीनाथ पाटील
वय वर्षे : २२, धंदा : शिक्षण
५) कु.मनाली पंढरीनाथ पाटील
वय वर्षे : २०, धंदा : शिक्षण
सर्व रा.पागोटे, जे.एन.पी.टी. ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही जाबदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी सामाईक मालक कै.सुरज पंढरीनाथ पाटील हे दि.१०/१२/२०१७ रोजी मौजे : मु.पागोटे, पो.जे.एन.पी.टी., ता.उरण, जि.रायगड येथे अविवाहित मयत झालेले आहेत. त्याअर्थी १) श्रीमती.सविता पंढरीनाथ पाटील, २) श्री.योगेश पंढरीनाथ पाटील, ३) श्री.चेतन पंढरीनाथ पाटील, ४) कु.प्रणाली पंढरीनाथ पाटील, ५) कु.मनाली पंढरीनाथ पाटील सर्व रा.पागोटे, जे.एन.पी.टी., ता.उरण, जि.रायगड यांनी खालील वर्णनाच्या सामाईक मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	युनिट के.नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर
पागोटे	**७७ अे**	**८८**	**६**	**0.१२.0४**
पागोटे	**२३२**	**२१**	**६**	**0.१६.0४**
		१0७	**९**	**0.0५.0६**
पागोटे	**७७ ब**	**२३**	**१**	**0.१४.00**
		४२	**३**	**0.0४.00**
		६0	**११ अे**	**0.१0.0७**
		१0१	**४ बी**	**0.११.0९**
		१२१	**१**	**0.१0.0९**
पागोटे	**३४/८५/८६**	**१६९**	**१0**	**0.१९.00**
		१७३	**१0**	**0.१२.00**
पागोटे	**१६१/८५/८६**	**१३६**	**२**	**0.१५.00**
		१३६	**९**	**0.0५.0४**
		१५६	**६**	**0.३८.0४**
		१५७	**८**	**0.१६.0४**
		१५८	**३**	**0.१३.0४**
		१५९	**१३**	**0.१२.४**
		१६७	**६**	**0.२८.४**
		१८३	**१३**	**0.0४.0८**
		१८४	**१५**	**0.0५.१२**
		१८७	**१३**	**0.0१.0४**
नवघर	**६९/८५**	**३४१**	**७**	**0.0८.0९**
		३४७	**४**	**0.१६.00**
		१५४	**२**	**0.0५.0८**
		१५४	**६**	**0.११.0६**
		१५६	**४**	**0.0८.0३**
		१६0	**३**	**0.0४.0५**
		३४४	**९**	**0.0४.0५**
		३४९	**६**	**0.0२.0३**
		३३0	**१**	**0.0६.0८**
		३३७	**२ क**	**0.१५.0२**
		३१४	**२ ब**	**0.१२.0९**
		३४२	**६ ब**	**0.0३.0६**
		३३७	**१ अे**	**0.१३.0४**

वरील अर्जदार हे मयत कै.सुरज पंढरीनाथ पाटील यांचे वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि जर अर्जदार हे कै.सुरज पंढरीनाथ पाटील यांचे वारस असल्याचे शाबीत झाले तर त्यांस वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.१४/१०/२०२१ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

शासनाच्या प्रतिमा निर्मितीसाठी समाज माध्यमाचा वापर आवश्यक : दयानंद कांबळे

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

माहिती व जनसंपर्क विभाग हा केवळ माहिती देण्यासाठी नाही तर, शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करण्यासाठी आहे. शासनाची चांगली प्रतिमा तयार करणे ही पारंपारिक माध्यमांसोबतच नवीन समाज माध्यम व आधुनिक तंत्रज्ञानाद्वारेही जलदगतीने केली जाऊ शकते. मात्र यात सातत्य असणे आवश्यक आहे. नवीन माध्यम हाताळतांना तांत्रिक आणि आशय निर्मितीबाबतची माहिती असणे गरजेचे आहे. असे मत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रभारी संचालक (वृत्त) श्री.दयानंद कांबळे यांनी व्यक्त केले.

आज विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन येथे समाज माध्यमांचा सुलभतेने वापर: शासन प्रतिमा या विषयावर आयोजित ऑनलाईन प्रशिक्षण सत्राच्या प्रारंभी ते बोलत होते. या प्रशिक्षण वर्गात पालघर,ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि कोकण भवन येथील अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते.

अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन कामातील गुणवत्ता वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. असे मत वैद्यकीय अधिकारी तथा कोकण भवन राजपत्रित अधिकारी महासंघाचे पदाधिकारी डॉ.गणेश धुमाळ यांनी व्यक्त केले. अधिकारी महासंघातर्फे देखील तांत्रिक प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी विभागीय माहिती कार्यालयाने पुढाकार घ्यावा असे सुचविले. ऑनलाईन प्रशिक्षण सत्राच्या प्रारंभी त्यांनी आपल्या भावना व्यक्त करून सदर प्रशिक्षणास शुभेच्छा दिल्या.

श्री लिलाई डिजीटल कम्युनिकेशन लि. यांच्या वतीने श्री.प्रणवकुमार भदाणे आणि श्री.चारुहास भदाणे यांनी शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी समाज माध्यमांचा सुलभतेने व दक्षतेने कसा वापर करावा या विषयावर प्रात्यक्षिकासह तांत्रिक मार्गदर्शन केले. संगणक आणि मोबाईलचा उपयोग करतांना सुरक्षितता असणे कसे आवश्यक आहे. या सोबतच अधिकाधिक लोकांच्या समोर जातांना कोणती नवमाध्यमे उपयुक्त ठरतील. याबाबतही माहिती त्यांनी दिली. यावेळी ऑनलाईन सहभागी असणारे अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्रत्यक्ष कामात येणाऱ्या अडचणीबाबत प्रश्नोत्तरे केली.

प्रशिक्षणाच्या प्रारंभी उपसंचालक (माहिती) कोकण विभाग डॉ.गणेश मुळे यांनी प्रास्ताविक केले. तर सहाय्यक संचालक (माहिती) श्री.नंदकुमार वाघमारे यांनी आभार मानले. ऑनलाईन प्रशिक्षण सत्रासाठी विभागात समन्वयाचे काम माहिती सहाय्यक श्री.प्रविण डोंगरदिवे यांनी पाहिले.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

द्रोणागिरी धरण तलाव साकवावरून...

बेकायदेशीर अवजड वाहतुकीमुळे साकवचे अस्तित्व धोक्यात

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : उरण तालुक्यातील मौजे चाणजे येथील द्रोणागिरी धारण तलाव क्र.२ वर शेतजमीनीच्या सुरक्षितेसाठी असलेल्या साकवावरून बेकायदेशीररित्या अवजड वाहतूक सुरु आहे. येथे अवजड वाहनांना बंदी असूनही या अवजड वाहनांची वाहतूक नेहमी सुरु असल्याने ही वाहतूक थांबवून हाईट गेज पूर्ववत करून साकवचे अस्तित्व अबाधित ठेवावेत अन्यथा चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बाधित शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे.

शेत जमीन सुरक्षितेसाठी सिडकोने मौजे–चाणजे, ता. उरण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन न करता शेतकऱ्यांच्या सर्व्हे न.४१८,४२२,४२३ या जमिनीवर साकव बांधले. साकवाच्या सुरक्षितेसाठी साकवावरून अवजड वाहतूक न होण्यासाठी हाईट गेज लावण्यात आले होते. परंतु महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (पत्र दी.२० मे २०१६ व २८ फेब्रुवारी २०१७) सिडको कार्यालय (पत्र दी.२६ डिसेंबर २०१६) यांच्याकडून करंजा टर्मिनल कंपनीस फक्त २०१६ चा पावसाळा होईपर्यंत हाईट गेज काढून २५ टनापर्यंत वजनाच्या वाहतुकीस पत्राद्वारे परवानगी देण्यात आली होती.

परंतु तेव्हापासून ते आत्तापर्यंत हाईट गेज लावण्यात आलेले नाही.परिणामी करंजा टर्मिनल प्रा.ली. कंपनीकडून जडवाहतूक बेकायदेशीररित्या होत आहे. विशेषतः रात्रीच्या सुमारास मोठया प्रमाणात जड वाहनांची ये–जा सुरु असते. त्यामुळे संबंधित साकवाचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. चाणजे शेतकरी संघर्ष समिती कडून संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना वारंवार पत्रव्यवहार करून देखील या गंभीर विषयाची दखल घेण्यात आलेली नाही परिणामी संघटनेकडून हायकोर्ट मध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

तसेच गेल्या महिन्यापासून करंजा टर्मिनल प्रा. लि.कंपनी कडून संबंधित साकव वरून बेकायदेशीररित्या २५ ते ३० टनाचा कार्गो सहित टिपर/हायवा ट्रकची मोठी अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे साकवचे अस्तित्व व शेतजमिनीचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

त्यामुळे ताबडतोब बेकायदेशीररीत्या चाललेली जडवाहतूक थांबवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून हाईट गेज पूर्ववत करण्यात यावे अन्यथा बाधित शेतकऱ्यांद्वारे तीव्र आंदोलन करण्यात येईल व होणाऱ्या परिणामास संबंधित प्रशासन जबाबदार राहील असा इशारा बाधित शेतकऱ्यांच्या वतीने चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी दिला आहे.

प्रधान सचिव–महसूल विभाग मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, विभागीय कोकण आयुक्त–नवी मुंबई, जिल्हाधिकारी–रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी–महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, सहाय्यक पोलीस आयुक्त, न्हावाशेवा, तसेच सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतूक शाखा, नवीमुंबई, व्यवस्थापकीय संचालक सिडको नवीमुंबई, तहसिलदार उरण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक उरण आदी ठिकाणी याबाबत पत्रव्यवहार करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनीवर असलेले साकव वरून वाहतुकी संदर्भात सिडको आणि मेरिटाईम बोर्ड यांचा कोणताही अधिकार नसताना शेतकऱ्यांना विश्वासात न घेता करंजा टर्मिनल्स प्रा. लि कंपनीला हा बेकायदेशीर अवजड वाहतूक करण्याचा अधिकार दिला कोणी असा सवाल चाणजे शेतकरी संघर्ष समितीने उपस्थित केला आहे.

मास्क व्यवस्थित घातला नसल्याची भिती दाखवून प्रवाशाची लुबाडणूक

दै.रायगड नगरी । पनवेल

महापालिकेचा कर्मचारी असल्याचे भासवून एका भामट्याने मास्क न वापरणाऱ्या एका ६१ वर्षीय नागरिकाला कारवाईपोटी १२०० रुपये दंड भरण्याची भिती दाखवून त्यांच्या जवळ असलेली रोख रक्कम आणि मोबाईल फोन लुटून पलायन केल्याची घटना घडली असून याबाबतची तक्रार पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पनवेल रेल्वे पोलिसांनी या भामट्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे. सदर प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव सहदेव तांदळेकर (६१) असे असून ते वडाळा येथे राहण्यास आहेत. सहदेव तांदळेकर बेलापूर मधील एका खाजगी कंपनीत शिपाई म्हणून कामाला आहेत. गत आठवड्यात तांदळेकर कामावरुन सुटल्यानंतर घरी जाण्यासाठी बेलापूर रेल्वे स्थानकावर आले होते. यावेळी एका अज्ञात भामट्याने महापालिकेचा कर्मचारी असल्याचे भासवून तांदळेकर यांनी व्यवस्थित मास्क लावला नसल्याचे सांगत त्यांच्यावर कारवाई करण्याची भिती दाखवली.

तसेच शर्टातील आयडीचा बेल्ट काढून दाखविण्याचा प्रयत्न करत त्यांना १२०० रुपये दंड भरावा लागेल, असे सांगितले.

यावेळी तांदळेकर यांनी त्यांच्याकडे पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर सदर भामट्याने तांदळेकर यांना फलाट व्रंमाक २ वर उभ्या असलेल्या बेलापूर–सीएसटी लोकलच्या अपंग डब्यात नेऊन त्यांना १२०० रुपयांची पावती फाडण्यास सांगितले.

शिवाय त्यांची झडती घेऊन त्यांच्याकडे असलेली ३६० रुपयांची रक्कम आणि मोबाईल फोन काढून घेतला. तसेच त्यांना सीएसटी बाजुकडे त्यांचे सहकारी असल्याचे सांगून त्यांच्याकडे जाण्यास तांदळेकर यांना बजावले. त्यानुसार तांदळेकर तेथे गेले. मात्र, त्याठिकाणी कोणीही नसल्याने ते पुन्हा घटनास्थळी आले असता सदर तेथून ठकसेनाने पलायन केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यानंतर सदर भामट्याने आपली फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर तांदळेकर यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार रेल्वे पोलिसांनी अज्ञात भामट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

मा.आ.मनोहर शेठ भोईर यांच्या प्रयत्नांने द्रोणागिरी शहरात लसीकरण कार्यक्रम संपन्न

दै.रायगड नगरी । उरण

शिवसेना द्रोणागिरी शाखा व द्रोणागिरी व्यापारी असोसिएशन तसेच द्रोणागिरी नवरात्रौत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहर शेठ भोईर तसेच उरण नगरपालिकेतील शिवसेना गटनेते गणेश शिंदे यांच्या सहकार्याने आज कोव्हीशिल्डचे २०० लसीचे डोस गरजू लोकांना मोफत देण्यात आले. सदर कॅम्प व्हॅक्सिनेशन द्रोणागिरी शहर शाखेने लावला होता.

या व्हॅक्सिनेशन कॅम्पला द्रोणागिरी येथील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि सर्वच्या सर्व कोव्हीशिल्डचे डोस संपले. पहिले डोस १६५ व दुसरे डोस ३५ नागरिकांनी घेतले सदर चा कॅम्प नवरात्रौत्सव मंडपामध्ये सकाळी दहा ते संध्याकाळी पाच या वेळेत घेण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर प्रमुख जगजीवन भोईर, उपशहर प्रमुख प्रतीक पाटील, द्रोणागिरी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रविंद्र पाटील, द्रोणागिरी शहर युवाधिकारी व नवरात्रौत्सव कार्यक्रमाचे अध्यक्ष करण पाटील, द्रोणागिरी शहर सचिव धनंजय शिंदे, उद्योगपती किसनशेठ म्हात्रे, व्यावसायीक नरसु पाटील, उद्योजक कुणाल पाटील व ड कैलास म्हात्रे, सर्व द्रोणागिरीतील कार्यकर्ते व शिवसैनिकांनी विशेष मेहनत घेतली.त्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

पर्यावरण रक्षक पंधरवाड्याचे भाजपतर्फे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश विभागाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण रक्षक पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले असून, भाजप रायगड जिल्ह्याच्या वतीने पर्यावरण विषयी संगम, वाटिका, पर्यावरण चित्रकला, झाडासोबत सेल्फी अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत पर्यावरण या विषयावर लहान गट (इयत्ता ५ वी ते ८ वी), मोठा गट (९ वी ते १२ वी) या गटातील विद्यार्थ्यांना चित्रकला स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. या स्पर्धत लहान गट व मोठ्या गटासाठी प्रथम पारितोषिक २००० रुपये, प्रोत्साहनपर पारितोषिक प्रत्येकी ४ विद्यार्थीसाठी ११०० रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. उत्तेजनार्थ पाच विद्यार्थ्यांना ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने पर्यावरणप्रेमी विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन पर्यावरण रक्षक पंधरवडा अभियानाच्या प्रदेश संयोजिका ॲड. माधवीताई नाईक (उपाध्यक्षा भाजप महाराष्ट्र), सहसंयोजक प्रवीण अलई, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी केले आहे.

स्पर्धत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांनी https://forms.gle/FHivTUnoTwtQDLmx8 या लिंक वर जाऊन गुगल फार्म भरावा.तसेच चित्रकला स्पर्धत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांनी --४ साईज कार्ड शिट वर रंगवलेले चित्रे दिनांक २० आक्टोंबर २०२१ पर्यंत स्थानिक भाजप कार्यालय येथे जमा करावेत. तसेच अधिक माहितीकरिता बिना गोगरी (८३६९३६५३५२), श्वेता ताडफळे (७३७८५८६५८७) यांच्याशी संपर्क साधावा.

मार्केट यार्ड येथे चालू असलेल्या बाजारपेठेत अतिक्रमण विभागामार्फत हप्ता वसुली?

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल येथील मार्केट यार्ड परिसरातील हात गाड्यांवरील कारवाई टाळण्यासाठी पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून हप्ता वसुली केली जात आहे. याप्रकरणी पनवेलचे आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे तक्रार करण्यात आली आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे जुनी बाजारपेठ आहे. या ठिकाणी सकाळी सहा ते दुपारी बारा वाजेपर्यंत बाजारपेठ भरते. या बाजारपेठेत बाहेरील शेतकरी आपला माल व्यापाऱ्यांना देत असतात. दोन वर्षांपासून कोरोना या संसर्गजन्य रोगामुळे लॉकडाऊन पुकारण्यात आले होते. तेव्हापासून सर्व व्यापाऱ्यांची परिस्थिती खराब झाली आहे. यात शिथिलता आल्यानंतर येथील व्यवसाय करणारे व्यावसायिक, हातगाडी चालक बाहेर येत नाहीत तोच महानगरपालिकेचा अतिक्रमण विभागाला हप्तेखोरीची कीड लागली.

अतिक्रमण विभागाने येथे हप्ते वसुलीचा कार्यक्रम सुरू केला आहे. या मार्केटमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे रोजंदारीवर काम करणारे काही जण हातगाडी लावतात तर काहीजण रस्त्यावर बसून आपल्या पोटापाण्यासाठी सकाळी सहा ते दुपारी बारापर्यंत भर उन्हात आणि पावसाळ्यात आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी धंदा करतात. मार्केट यार्ड मध्ये या लोकांना हात गाडी लावण्यासाठी हातगाडीमागे एक हजार ते दोन हजार रुपये मोजावे लागत असल्याचे समोर आले आहे. आणि रस्त्यावर बसणाऱ्यांना ५०० रुपये मोजावे लागतात. अतिक्रमण विभाग हे हप्ता गोळा करत असल्याचे सांगण्यात आले आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाला पैशांची चटक लागल्याने हप्ते वसुली केली जात आहे. जर एकट्या मार्केट यार्ड मधुन हफ्त्याची मागणी इतकी होत असेल तर पूर्ण पभाग समिती अ ब क ड येथून किती हफ्ते गोळा होत असतील, यावर कारवाई होणार का ? का हे असेच चालु राहणार...?असा सवाल उपस्थित होत आहे. गेली दोन महिने हफ्ते व्यवस्थित पोहोचल्याने या ठिकाणी कोणतीही कारवाई झाली नाही मात्र आता हप्त्याची रक्कम वाढवल्यामुळे ही रक्कम कशी भरायची असा प्रश्न येथील हातगाडी चालकांना पडला आहे. याची तक्रार आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

जुगार अड्ड्यावर खांदेश्वर पोलिसांची कारवाई

दै.रायगड नगरी । पनवेल

बेकायदेशीर सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलीस उपायुक्त कार्यालय पथक व खांदेश्वर पोलिसांकडून धाड टाकत मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. यावेळी जुगार खेळणाऱ्यावर कारवाई करीत खांदेश्वर पोलीस ठाण्यात सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बेकायदेशीर जुगार सुरु असल्याची माहिती परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्तांच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार त्यांचे पथक व खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पथकाकडून जुगार अड्ड्यावर धाड टाकत धडक कारवाई केली. यावेळी त्याठिकाणी जुगार खेळणाऱ्या सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले यावेळी पोलिसांनी जुगार खेळणाऱ्यांकडून ३७००० रुपये रोकड व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. याप्रकरणी सहा जणांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७, १२ अ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवसाला पावणारी रोठची आई भवानी माता

दै.रायगड नगरी । खांब–रोहा

रोहे तालुक्यातील रोठ खु.येथील आई भवानी माता एक जाग्रुत देवस्थान म्हणून ओळखले जाते तसेच ही देवी नवसाला पावते अशी समस्त भाविकांची गाढ श्रद्धा असून याची प्रचिती प्रत्येक भक्ताला वेळोवेळी आलेली आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात व कुंडलिका नदी तिरावर प्रशस्त जागेत भवानी मातेचे सुंदर व देखणे असे मंदिर गावाच्या नावलौकिकात भर घातले. भवानी मातेचे सुंदर मंदिर पाहताच भक्तांचे मन देखील प्रसन्न होते. मंदिराच्या आत प्रशस्त सभा मंडप व त्या पुढील गाभाऱ्यात भवानी माता स्थानापन्न झाली आहे. मंदिराचे उंचच उंच कळस मंदिराचे सौंदर्य अधिकच खुलवितात.

रोहे तालुक्यासह समस्त रायगड जिल्ह्यात रोठची भवनी माता एक जागरूक देवस्थान म्हणून प्रसिद्धीस पालल्याने नवरात्रोत्सव काळात येथे दूरवरून भाविक भक्त व भगिनी मोठ्या संख्येने येतात. या नऊ दिवसाचे कालावधीमध्ये मंदिर परिसराचे करण्यात आलेले सुशोभीकरण तसेच मंदिरात संपन्न होत असलेले धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम तसेच सामाजिक प्रबोधनपर व मनोरंजक कार्यक्रमामुळे गावामध्येही उत्साहाचे व मांगल्याचे वातावरण निर्माण होते. आमची भवानी माता भक्तांचा हाकेला धावणारी व मनोकामना पुर्ण करणारी देवी म्हणून मातेची ख्याती असल्याने नवरात्रात मोठ्या संख्येने भाविक भक्त येथे नवस फेडण्यासाठी व दर्शनासाठी येतात तर वर्षभरही भाविक भक्तांची येथे रांग लागलेली असते. तर या संपूर्ण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ, महिला मंडळ व तरूण मंडव तसेच नवरात्रोत्सव कमिटी मंडळ मोलाचे सहकार्य करित असल्याबाबतची माहिती मंदिरिचे पुजारी सचिन मोरे यांनी दिली आहे.

HAPPY DASARA

ADITYA PUBLICITY & MEDIA SERVICES

Think of us for Advertising Solution

● Digital Advertising ● Pole Kiosk (with Municipal Premission) ● Cycle Advertising ● Konkan Railway Stations (Upto Goa) ● Hording (Highways & within City) ● News Paper Advertising ● News Paper Insertion ● Railway Station Boards ● Bus Shelter (Navi Mumbai) ● Bus Back Panel (TMT) ● Gantries ● Mall Branding ● Glow Sign (Acralic & Metal Board) ● S.T.Stand Multiplex Advertising ● Sky Walk Advertising ● Standees ● Brochures ● Leafflets

R.H.No.F/129/03, Cosmo CHS. Behind St. Joseph School, Near Maruti
Rachna Bldg. Sector-7, New Panvel, Navi Mumbai-410206
8652749885 / 9326464150/ 7276366455
Email : madhukar.rikame5@gmail.com www.adityaads.com